# प्रेस नोट

## दिनांक १२/०२/२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री.किशोर वामनराव गोहाड, वय–५० वर्ष, पद–कनिष्ठ सहायक, प्राथमिक आरोग्य केंद्र टेंभुसोंडा, ता.चिखलदरा. जि.अमरावती वर्ग– ३ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | १२.०२.२०२१ चे १३.०४ ते १३.२५ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | १,०००/–रु. |
| ५ | पडताळणी दरम्यान स्विकारण्याचे मान्य केलेली लाच रक्कम | १,०००/–रु. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | १,०००/– रुपये |
| ६ | घटनास्थळ | मोरया चहाची कॅन्टीन, गुल्हाने नर्सींग होम जवळ, वकील लाईन परतवाडा ता.अचलपूर जि.अमरावती. |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे प्राथमिक आरोग्य केंद्र टेंब्रुसोंडा येथे आरोग्य सेवक या पदावर कार्यरत असुन त्यांनी दि.११/०२/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारी च्या अनुषंगाने आज दि.१२/०२/२०२१ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र टेंभुसोंडा येथील कनिष्ठ सहायक श्री. किशोर गोहाड यांनी तक्रारदार यांना त्यांचे कालबध्द वेतन श्रेणी लागु करण्याचे प्रस्ताव तयार करून जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. अमरावती यांना पाठविण्या करीता १,०००/–रु. लाचेची मागणी पंचासमक्ष करुन स्विकारण्याचे मान्य केल्याने सापळा कारवाई आयोजित केली असता सापळा कार्यवाही दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र टेंभुसोंडा येथील कनिष्ठ सहायक श्री. किशोर गोहाड यांनी तक्रारदार यांचे कडुन १,०००/– रूपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री. विशाल गायकवाड, अप्पर पोलीस अधिक्षक श्री.अरूण सावंत, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, रविन्द्र जेधे, पोलीस निरीक्षक श्रीमती रूपाली पोहनकर पोकॉ. श्री.पंकज बोरसे,, श्री.राजेश कोचे श्री. आशिष जांभोळे तसेच चालक सपोउपनि सतिश किटुकले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यानी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा

संपर्क :– अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती टोल फ्री क्र. – १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ – २५५२३५५, २५५३०५५.

(रविन्द्र जेधे)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय
सत्यमेव जयते
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

Scanned with CamScanner